# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईतील धारावी पुनर्विकासाबाबत

**(१) २००२४ (११-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकासातील इमारत तयार असून अद्याप पर्यंत रहिवाशांच्या पात्रतेचे काम पूर्ण न झाल्यामुळे त्यांना सदनिकेचा ताबा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रहिवाशांच्या पात्रतेचे काम अतिशय मंद गतीने सुरु असून अद्याप पर्यंत फक्त २१५ रहिवाश्याची यादी तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित रहिवाशांची पात्रतेची यादी केव्हा पूर्ण होणार व त्याला किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०५-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) धारावी पुनर्वसन प्रकल्पातील सेक्टर ५, क्लस्टर "जे" मधील झोपडीधारकांच्या पात्रतेचे काम अंतिम टप्प्यात असून एकूण ८५१ झोपडीधारकांपैकी ५२४ झोपडीधारकांचे प्रारुप परिशिष्ट-II दिनांक २१.१०.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर यादी अंतिम करुन पात्र झोपडीधारकांना पुनवर्सन सदनिका लवकरच वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई शहरात उभारण्यात आलेल्या ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळी अतिधोकादायक झाल्याबाबत

**(२) २२५९४ (१२-०८-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत),**

**श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सन १९२३ मध्ये उभारण्यात आलेल्या सुमारे १६ ताडवाडी बी.आय.टी चाळी अतिधोकादायक झाल्या असून गत दशकापासून या चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित असल्यचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिधोकादायक इमारतींना महानगरपालिकेने नोटीस बजावूनही या चाळींमध्ये सुमारे १ हजार ३६२ रहिवाशी वास्तव्य करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताडवाडी बी.आय.टी. चाळींचा दीर्घकालीन प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्याकरीता शासनाकडून कोणता ठोस निर्णय वा अंमलबजावणी करण्यात आली आहे,

(४) असल्यास, स्थानिक रहिवाशांना पर्यायी जागा उपलब्धतेबाबत कोणते धोरण शासनाने अवलंबिले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-०२०१) :** (१), (२) व (३) मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील भूकर क्रमांक १०४ या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूभागावर १ ते १६ बी.आय.टी. चाळी अस्तित्वात आहेत.

सन २०१५ मध्ये सदर इमारतींचे/चाळींचे संरचात्मक सल्लागार मे.स्ट्रक्टवेल कन्सल्टंट यांचेकडून प्राप्त झालेल्या संरचनात्मक सर्वेक्षण अहवालानुसार सदर इमारती भागश: रिक्त/निष्कासित करुन दुरुस्त करण्यायोग्य होत्या.

त्यानुसार महानगरपालिकेमार्फत इमारती दुरुस्ती करण्याकरिता विकासकास वेळोवेळी कळविण्यात आले होते. परंतु विकासकाने महानगरपालिकेच्या पत्रांची दखल न घेतल्याने सदर चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी मे. ग्रेस आणि रबरवाला सिटी डेव्हलपर्स या विकासकास दिनांक १६.०५.२००८ रोजी इरादापत्र देण्यात आले होते.

परंतु विकासकाने अद्यापपर्यंत पुनर्विकासामध्ये लक्षणीय प्रगती न केल्यामुळे सदर इरादापत्र रद्द करण्यात आल्याबाबत संबंधित विकासकास दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर पुनर्विकासाचे इरादापत्र रद्द केल्यामुळे विकासकाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ३४४१/२०१८ दाखल केली असून, त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. यास्तव सदर प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सद्य:स्थितीत ताडवाडी येथील बी.आय.टी. इमारतींची दुरुस्ती मे.स्ट्रक्टवेल कन्सल्टंट यांनी सादर केलेल्या संरचनात्मक सर्वेक्षण अहवालानुसार महानगरपालिकेच्या इमारत परिरक्षण विभागामार्फत सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

इमारत क्रमांक ६ व ७ रिकामी करुन, दुरुस्त करावयाचे आदेश प्राप्त झाल्यानुसार, सदर इमारतीतील रहिवाशांना पर्यायी व्यवस्था म्हणून माहूल, चेंबूर येथील संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरीत होण्यासाठी वाटपपत्रे देण्यात आली होती. तथापि, तेथील रहिवाशांनी सदर वाटपपत्रे न स्विकारल्यामुळे ती परत आली आहेत.

सद्य:स्थितीत सदर इमारतींचे पुन:परिक्षण झाले असून, त्या सी-२बी (रहिवाशांना तेथेच ठेवून त्या दुरुस्त करणे) या प्रवर्गात येत असल्याने व तेथील इमारतींचे दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(४) व (५) सदर पुनर्विकास प्रकल्पातील १६ इमारतींपैकी इमारत क्रमांक १२ ते १६ या ५ इमारती मोडकळीस आल्यामुळे त्या निष्कासित करण्यात आल्या आहेत. सदर ५ इमारतींमधील १८० रहिवाशांचे पुनर्वसन त्याच जागेवर बांधलेल्या ३ संक्रमण शिबिरांमध्ये व २२० रहिवाशांचे पुनर्वसन माहूल, चेंबूर येथील सदनिकांमध्ये करण्यात आले आहे.

उर्वरित रहिवाशी स्थित इमारतींमध्ये वास्तव्य करीत असून, सदर इमारतींची दुरुस्ती संरचनात्मक सल्लागारांच्या अहवालानुसार प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**राष्ट्रपुरुष आणि थोर व्यक्तींची स्मारके, पुतळे उभारण्याबाबत**

**(३) २३९१३ (१०-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१०-११ मध्ये राष्ट्रपुरुष आणि थोर व्यक्तींची स्मारके, पुतळे उभारण्याच्या निर्णयानुसार कोल्हापुरात कला महर्षी बाबुराव पेंटर यांचे स्मारके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्हीच्या अनास्थेने हा प्रस्ताव अद्यापही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१९) :** (१), (२) व (३) कला महर्षी बाबुराव पेंटर यांचे स्मारकाच्या संबंधित कोणतीही शिल्पकृती अथवा, पुतळा कोल्हापूर महानगरपालिकेच्या जागेवर प्रस्तावित केलेला नाही. तथापि, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सदरचे स्मारक कला निकेतन शिक्षक संस्था, कोल्हापूर यांच्या मालकीच्या जागेवर सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्या मार्फत उभारण्याचे प्रस्तावित असल्याची वस्तुस्थिती कोल्हापूर महानगरपालिकेने कळविली आहे.

• तथापि, सदर स्मारकाचे अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत कोणतीही कार्यवाही करावयाची असल्यास ती तातडीने करावयाच्या सूचना कोल्हापूर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दहिसर (प) येथील मंडपेश्वर गुंफा परिसराचा विकास करण्याबाबत**

**(४) ३८४७७ (२३-१२-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर (प) येथील मंडपेश्वर गुंफा परिसराचा विकास करण्याबाबत मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपल्या पत्राद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-०६-२०१९) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या अहवालानुसार, मा.महसूल मंत्री अथवा मा.लोकप्रतिनिधीं यांचेकडून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ या कार्यालयाकडे अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाले नाही.

जिल्हाधिकारी, मुंबई यांच्या दि.६.८.२०११ च्या आदेशान्वये सन २०११-१२ अंतर्गत "पर्यटन स्थळाचा विकास" या योजनेंतर्गत मंडपेश्वर गुंफेच्या परिसर सौंदर्यीकरणाच्या ७ कामासाठी रु.१०५.०० लक्ष रक्कमेस मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ या कार्यान्वयीन अभिकरणास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. मंडपेश्वर गुंफा परिसर सौंदर्यीकरणाच्या कामास भारतीय पुरातत्व विभागाकडून अनापत्ती प्रमाणपत्र व ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने सौंदर्यीकरणाची कामे करण्यात आली नाहीत.

(२), (३), व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील रुग्णालयांत उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) ५१५२८ (११-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील रुग्णालयांत उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने मुंबईतील केईएम, सायन, नायर व जे.जे. रुग्णालयांवरील रुग्णांचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगरातील रुग्णालयांत रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०४-२०१९) :** (१), (२) व (३) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांमार्फत रुग्णांना माध्यमिक आरोग्य सेवा दिल्या जातात. तथापि काही गंभीर किंवा अतिगंभीर रुग्णांना विशिष्ट अशा तृतीय क्षेणी स्तरावरील उपचारांची गरज भासल्यास, त्या रुग्णांना के.ई.एम., नायर व सायन रुग्णालयात पाठविले जाते.

सदर उपनगरीय रुग्णालयांतील सेवा-सुविधा वाढविण्यासाठी तसेच उच्च दर्जाची सेवा देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या / येत आहेत :-

• दिनांक ०५.१२.२०१६ रोजी वैद्यकीय संवर्गातील ८१६ पदे निर्माण करण्यात आली असून, त्यातील ७० पदे अपघात विभाग वैद्यकीय अधिकारी, ७८ पदे प्रबंधक, २८९ पदे वरिष्ठ पदव्युत्तर प्रबंधक, १०५ पदे आवास अधिकारी यांची भरण्यातं आली असून, २७४ पूर्ण वेळ पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

• वाढत्या रुग्णसंख्येच्या अनुषंगाने मुलुंड येथील म.तु.अगरवाल रुग्णालय, गोवंडी (पूर्व) येथील पं.म.मो. मालवीय शताब्दी रुग्णालय व बोरीवली येथील भगवती रुग्णालय या उपनगरीय रुग्णालयांत सक्षमीकरण, विस्तारीकरण व दर्जोन्नती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहे.

• तसेच, सी.टी.स्कॅन, एम.आर.आय.स्कॅन, डायलिसीस, अतिदक्षता विभाग, नवजात शिशु अतिदक्षता विभाग व बालरोग अतिदक्षता विभाग या सेवा सुरु करण्यात आल्या असून, आवश्यक ती यंत्रे व संयंत्रे खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**मुंबईतील म्हाडाच्या विशेष भूसंपादन अधिकारी यांनी म्हाडा अधिनियम व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत**

**(६) ५४९४० (२९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या सहकार विभागातील विशेष भूसंपादन अधिकारी यांनी म्हाडा अधिनियम व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन तसेच भूसंपादन रदद करण्याचा कायदाच अस्तित्वात नसतांना ग्रँटरोड (पश्चिम) तुकाराम जावजी रोड भू. क्र.३१०, दत्तप्रसाद गृहनिर्माण संस्थेचे म्हाडा अधिनियम प्रकरण ८अ कलम १०३ब चे पोटकलम (५) आणि कलम ९३ ची पोटकलमे ३ व ४ अन्वये शासनाने केलेले भूसंपादन रदद केल्याची अधिसूचना दिनांक १० मार्च, २०१६ रोजी जारी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ एप्रिल, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बेकायदा भूसंपादन रदद करणारी दिनांक १० मार्च, २०१६ रोजीची अधिसूचना रदद करणेबाबत तसेच संबंधीत भूसंपादन अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२२-०५-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन पत्र, दि.१६.०८.२०१३ रोजीच्या पत्रान्वये भूकर पाहणी क्र.३१०, ग्रँटरोड पश्चिम, तुकाराम जावजी रोड, दत्तप्रसाद गृहनिर्माण संस्था (नियोजित) या मालमत्तेच्या भूसंपादनाबाबत दि.०५.०८.१९९४ रोजी काढलेली अधिसूचना निष्प्रभ / रद्द करण्यास काही अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यामधील महत्वाची अट खालीलप्रमाणे आहे :-

"मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुमती याचिका SLP (Civil) क्र.१३४२८/१९९६ ही उपरोक्त इमारतीचे मालक यांनी इमारतीचे भूसंपादन आणि म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९३ (५) अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.०५.०८.१९९४ च्या अधिसूचनेची अंमलबजावणी थांबविण्यासंदर्भात दाखल कलेली आहे. त्यामुळे सदरची अधिसूचना रद्द करण्यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अथवा याचिकेतील सर्व पक्षांनी मा. सर्वोच्च न्यायालयासमारे Consent term दाखल केल्यानंतर जर मा. सर्वोच्च न्यायालयानले Consent term दाखल करून घेऊन निकाली काढली तरच वरील मान्यतेनुसार दि.०५.०८.१९९४ ची अधिसूचना निष्प्रभ (Rescind) / रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यास म्हाडाला अनुमती देण्यात येत आहे."

(२) होय.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई सेंट्रल व भायखळा येथील बीआयटी चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(७) ५७६२९ (२९-०८-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल व भायखळा येथील बीआयटी चाळी १०० वर्ष जुन्या झाल्यामुळे त्या अत्यंत धोकादायक होऊन चाळींच्या अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणात पडझड होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक झालेल्या बीआयटी चाळींच्या पुनर्विकासाठी सदर चाळीतील रहिवाश्यांना नोटीसा बजावून ती खाली करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने सदर चाळींच्या पुनर्विकासाबाबतचा आराखडा तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेतली आहे काय,

(४) असल्यास, किती कालावधीत सदर चाळींचा पुनर्विकास पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मुंबई सेंट्रल व भायखळा परिसरात एकूण ५४ बी.आय.टी. इमारती आहेत, त्यापैकी १८ इमारतींचे पुनर्विकास प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाले असून, सद्य:स्थितीत १७ बी.आय.टी. इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत.

उर्वरित एका इमारतीतील रहिवाशांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

सदर ५४ इमारतींपैकी २९ बी.आय.टी. इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून, २ इमारतींची कामे प्रगतीपथावर आहेत.

उर्वरित ५ इमारतींपैकी ३ इमारती धोकादायक असल्याने, तेथील रहिवाशांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १०५ ब नुसार चाळी रिक्त करण्याच्या नोटीसा बजावल्या असून, सदर रहिवाशांनी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या असून, सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच, २ इमारती रिक्त करण्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांना कळविण्यात आले आहे.

ताडवाडी येथील इमारत क्रमांक ६ व ७ रिकामी करुन, दुरुस्त करावयाचे आदेश प्राप्त झाल्यानुसार, सदर इमारतीतील रहिवाशांना पर्यायी व्यवस्था म्हणून माहूल, चेंबूर येथील संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरीत होण्यासाठी वाटपपत्रे देण्यात आली होती. तथापि, तेथील रहिवाशांनी सदर वाटपपत्रे न स्विकारल्यामुळे ती परत आली आहेत.

सद्य:स्थितीत सदर इमारतींचे पुन:परिक्षण झाले असून, त्या सी-२बी (रहिवाशांना तेथेच ठेवून त्या दुरुस्त करणे) या प्रवर्गात येत असल्याने व तेथील इमारतींचे दुरुस्तीचे काम सुरु आहे.

मुंबई सेंट्रल येथील बी.आय.टी. चाळ क्र. १ ते १९ पैकी एकही इमारत धोकादायक म्हणून घोषित केलेली नाही.

बी.आय.टी. चाळी या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर असल्याने, त्यांच्या पुनर्विकासाबाबत शासनाची मान्यता घेण्यात आली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मुंबई मधील उपनगरांमध्ये पुरेशा आरोग्यसेवा उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिलांच्या मृत्युदरामध्ये वाढ झाल्याबाबत

**(८) ६९६८० (१०-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील उपनगरांमध्ये पुरेशा आरोग्यसेवा उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिलांच्या मृत्युदरामध्ये वाढ झाल्याचे सन २०१५-१६ च्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालामध्ये निदर्शनास आल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन स्तरावर कोणत्या तातडीच्या उपाययोजना केल्या जात आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१९) :** (१) मुंबई उपनगरामध्ये सन २०१५-१६ मध्ये मातामृत्युचे प्रमाण दर एक लाख प्रसुतीमागे २०० होते, तसेच सन २०१७-१८ मध्ये हे प्रमाण दर एक लाख प्रसुतीमागे १३२ झाल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) मातामृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• सर्व आरोग्य संस्थांमध्ये प्रसुतीपूर्व तपासणी, रुग्णालयांमध्ये प्रसुती होण्यासाठी शासनाने आखलेल्या जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृ वंदना इत्यादी योजना राबविल्या जातात.

• सर्व प्रसुतीगृहे व रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी तपासणी तसेच, प्रयोगशाळेतील तपासण्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

• गरोदर मातांना आवश्यकतेनुसार रुग्णालयात नेण्याकरिता १०८ या रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध आहे.

• जिल्हास्तरीय गुणवत्ता अभिवचन समितीद्वारे दर महिन्याला माता मृत्यूचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना सुचविल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गणपावडर रोड, माझगाव (मुंबई) येथील भाडेपट्टा संपुष्टात आलेली मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत

**(९) ७७०६८ (१२-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणपावडर रोड, माझगाव (मुंबई) येथील सीएसक्र.९ मधील १९७२ साली भाडेपट्टा संपुष्टात आलेली मालमत्ता ४४ वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही शासनाने ताब्यात घेतली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मालमत्तेचा ताबा शासनाने अद्यापपावेतो न घेण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर मालमत्ता त्वरित ताब्यात घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सी.एस.क्र. ९, माझगांव विभाग हा गणपावडर रोड येथे नसून, नवाब टँक रोड येथे स्थित आहे.

सदर भूभाग हा खेळाचे मैदानासाठी आरक्षित असून, त्याचे क्षेत्रफळ १५०६ चौ.मी. इतके आहे.

सदर भूभाग विकसित असून, सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत त्याचे परिरक्षण करण्यात येत आहे.

तसेच, मालमत्ता पत्रकानुसार सदर भूभाग महानगरपालिकेच्या मालकीचा असल्याची नोंद असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**सोलापूर शहरातील जड वाहतूक शहराबाहेरुन वळविण्याबाबत**

**(१०) ७८५३८ (१३-०४-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात जड वाहतूकीमुळे ८ दिवसात रंगभवन चौकात श्रीमती पूनम काटकर व तीन वर्षाचा मुलगा अपूर्व काटकर तसेच विकोप्रोसेसजवळ २ कॉलेज विदयार्थ्यांचा अत्यंत दुर्दैवीपणे वाहनाखाली मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरातील बाहेरुन येणारी जड वाहतूक तात्काळ बंद करण्याबाबत व जड वाहतूक कायमस्वरुपी शहराबाहेरुन वळविण्याकरिता पर्यायी बाहयवळण जड वाहतूक सुरु करण्यास स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहरातील जड वाहतूक कायमस्वरुपी शहराबाहेरुन वळविण्यासाठी शासनाने कोणाती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

दिनांक २४.१०.२०१६ रोजी रंगभवन चौकात झालेल्या अपघातात श्रीमती पुनम काटकर व तीचा तीन वर्षाचा मुलगा अपुर्व काटकर मयत झाले आहेत. त्या संदर्भात जेल रोड पो.ठाणे येथे गुरंन ३९३/१६ भा.द.वि.३०४, २७९, ३३७, ३३८ या कलमन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

तसेच दिनांक १९.१०.२०१६ विकोप्रोसेसजवळ झालेल्या अपघातात सैफुदीन अफसर शेख हा विद्यार्थी मयत झाला आहे. त्या संदर्भात जेल रोड पो.ठाणे येथे गुरंन ३८७/१६ भा.द.वि. ३०४, २८९, ३३७, ३३८ या कलमान्वये गुन्हा दाखल केला झाला आहे.

(२) (३) व (४) होय हे खरे आहे, सोलापूर शहरातील जड वाहतूक कायमस्वपी शहराबाहेरून वळविण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्यामुळे शहराच्या मध्यभागातून होणा-या जड वाहतूकीच्या वेळेत आवश्यक ते बदल करण्यात आलेले असून त्याची अमंलबाजवणी चालू आहे.

---

**नागपूर येथील सहायक संचालक नगर रचना यांनी अकृषिक प्रकरणांमध्ये शासनाचे अभिशुल्क वसूल न करता शासनाचे नुकसान केल्याबाबत**

**(११) ८४७४६ (२१-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील श्री.मेहर, सहायक संचालक नगर रचना यांनी मागील २ वर्षांपासून अकृषिक प्रकरणांमध्ये शासनाचे अभिशुल्काचे २५ कोटी रुपये वसूल न करता परस्पर अकृषिक अभिन्यासाला मंजूरी दिल्याबाबत चौकशी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी प्रधान सचिव-नगरविकास विभाग यांच्याकडे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. मेहर, सहाय्यक संचालक, नगररचना, नागपूर यांनी शासनाचे अभिशुल्काचे २५ कोटी रुपये वसूल न करता संबंधितांशी संगनमत करुन आर्थिक गैरव्यवहार करुन शासनाचे करोडो रुपयांचे महसूलाचे आर्थिक नुकसान करुनही त्यांच्याविरुध्द कारवाई न करता त्यांना पदोन्नती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार श्री.मेहर, सहाय्यक संचालक, नगररचना, नागपूर यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१९) :** (१) होय.

(२) श्री.दि.मा.मेहेर, तत्कालीन सहाय्यक संचालक, नगररचना, नागपूर यांना आस्थापना मंडळ क्र.२ च्या दि.०४/०६/२०१६ च्या बैठकीतील शिफारशीनुसार शासन निर्णय क्र.पदोन्न-१३१६/१०९/प्र.क्र.०२/नवि-२७, दि.०४/०१/२०१७ अन्वये उप संचालक, नगररचना या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी श्री.दि.मा.मेहेर, तत्कालीन सहायक संचालक, नगररचना, नागपूर शाखा (सध्या उप संचालक, नगररचना, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई) यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९८१ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यास शासनमान्यता प्राप्त झाली असून सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे जालगाव (ता.दापोली,जि.रत्नागिरी) स.न.३२ हि.नं.१५, सि.स. नं.२१०, २११, २१२ पैकी १३३० चौ.मी. क्षेत्रावरील इमारत बांधकाम नियमांचे उल्लंघन करून नदीच्या पात्रात करण्यात आल्याबाबत**

**(१२) ९१०५६ (१८-०९-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जालगाव (ता.दापोली, जि.रत्नागिरी) स.न.३२ हि.नं.१५, सि.स. नं.२१०, २११, २१२ पैकी १३३० चौ.मी. क्षेत्रावरील इमारत बांधकाम हे शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून नदीच्या पात्रात करण्यात आल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमानुसार नदीच्या पात्रापासून ९ मी. अंतर सोडणे तसेच दापोली-दाभोळ हा राज्यमार्ग क्र १७ या रस्त्यावरून ४० मी. अंतर सोडणे आवश्यकता असतानाही नियमांचे उल्लंघन करुन इमारत बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जमीन क्षेत्रामध्ये पूर्वीपासून विहीर होती ती बुजवून पाणीस्त्रोत बंद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त व अन्य बाबीसंदर्भात स्थानिक रहिवाशी यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी कली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार उक्त जमीन क्षेत्रातील बिनशेती परवानगी व बांधकामाची चौकशी करून दोषी व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१९) :** (१) अशी बाब नाही. भूखंडाच्या दक्षिणेकडून वहात असलेल्या प-या (पाण्याचा स्त्रोत) पासून सदर इमारत ९.०० मी. अंतरावर आहे.
(२) दक्षिणेकडून वाहत असलेल्या प-या (पाण्याचा स्त्रोत) पासून इमारतीचे अंतर ९.०० मी. आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी दिलेल्या ना-हरकत दाखल्यानुसार रस्त्याच्या मध्यापासून २०.० मी. अंतर सोडून परवानगी देण्यात आली आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) होय, श्री.प्रसाद गणेश कर्वे यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.१५/६/२०१६ रोजीचे पत्रान्वये केलेल्या तक्रार अर्जाची प्रत विभागीय आयुक्त यांना दिली आहे.
(५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी दि.९/१/२००९ रोजीच्या पत्रान्वये पूर्वी दिलेला ना हरकत दाखला रद्द केला आहे. त्यामुळे बिनशेती परवानगीसाठीची कायदेशीर पूर्तता होत नसल्याने प्रकरणामध्ये सदरचा बिनशेती आदेश पुनर्विलोकनास घेणेची कार्यवाही जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयाकडून सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरांची संख्या वाढली असल्याबाबत

**(१३) ९६०५४ (३०-१२-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून दलाल व अधिकारी, स्थानिक राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप यामुळे कोट्यवधी रुपये वसुली झालेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरांची संख्या किती आहे तसेच संक्रमण शिबिरातील किती वसुली थकीत आहे त्याच प्रमाणे दलाल व त्यांच्याशी संगनमत करणाऱ्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०५-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

संक्रमण शिबीरातील घुसखोर/अनधिकृत रहिवाशांविरुध्द म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम ९५ (अ) (३) अंतर्गत वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु, या घुसखोरांविरुध्द निष्कासन कारवाई करताना म्हाडाकडील अपुरे मनुष्यबळ, अपुरा पोलीस बंदोबस्त, शैक्षणिक व धार्मिक कारणावरुन निष्कासन मोहिमा स्थगित करणे अशा विविध कारणांमुळे निष्कासन कारवाई सफल होऊ शकलेली नाही.

(२) व (३) मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबीरांची सन २०१० मध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गट निर्माण करुन संक्रमण शिबीरातील गाळ्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली होती. माहे जुलै, २०१३ अखेरपर्यंत संक्रमण शिबीरामध्ये ८,४४८ अनधिकृत रहिवासी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर, २०१८ अखेर रु. ११८.७० कोटी इतकी रक्कम थकीत आहे.

संक्रमण शिबीरातील अनधिकृत/घुसखोर रहिवाशांना नियमानुकूल करण्याबाबत दि.०४.०२.२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आलेला असून, त्यानुसार या रहिवाशांचे पुनर्वसन करताना त्यांच्याकडून मंडळास अदा करण्यात येत असलेले भाडे/देखभाल शुल्क त्यांच्याकडून प्रथम वसूल करण्यात येणार आहे. तसेच, म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्यांमधील अनधिकृतपणे झालेल्या घुसखोरीस जबाबदार असलेल्या म्हाडातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निदेशही मंत्रीमंडळाने दिलेले आहेत.

तसेच, संक्रमण शिबीरातील अनधिकृत/घुसखोर रहिवाशांना नियमानुकूल करण्याबाबत मा. मंत्रीमंडळाने घेतलेला निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्यानंतरच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ मध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्यास त्यासह या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील, असाही निर्णय दि. ०४.०२.२०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे.

---

**साहित्यिक बा.सी.मर्डेकर यांचे मर्डे (जि.सातारा) या त्यांच्या मुळगांवी स्मारक उभारण्याबाबत**

**(१४) ९८४०४ (०३-०१-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील मर्डे या गावातील साहित्यिक बा.सी.मर्डेकर यांच्या मर्डे (जि.सातारा) या मुळगांवी त्यांचे स्मारक बांधुन पूर्ण होऊन तीन वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे तथापि सदर स्मारकाचे उद्घाटन अदयाप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर स्मारकाचे उद्घाटन तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) स्मारकाच्या खिडक्यांना काचा बसविण्याचे व इमारत स्वच्छ करण्याचे काम सुरू असून सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर काम पूर्ण झाल्यावर उदघाटनाची कार्यवाही ग्राम पंचायत, मर्ढे यांचेकडून करण्यात येणार आहे.

---

**वडाळा येथील शासकीय भूखंडावर बांधण्यात आलेल्या गगनचुंबी इमारतीबाबत**

**(१५) १०१७४४ (२१-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा (मुंबई) येथील जिल्हाधिकारी, मुंबई यांच्या अखत्यारीतील शासनाच्या भुखंडावर न्यू कफ परेड नावाने वसाहत निर्माण करुन गगनचुंबी इमारत उभारल्या जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडावर इमारत उभारण्यापूर्वी विकासकाने शासनाकडून परवानगी घेतली होती काय,

(३) असल्यास, वडाळा येथील उक्त भूखंड शासनाने विकासकास कोणत्या नियमानुसार वाटप केला आहे व त्यामधून शासनास किती रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१९) :** (१) होय.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने वडाळा येथील भूखंड क्र. ब्लॉक-सी या भूखंडाचा विकासाकरिता विविध परवानग्या देण्यात आल्या आहेत.

(३) वडाळा येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील वाणिज्य वापराचा भूखंड क्र. ब्लॉक - सी हा भूखंड भाडेपट्ट्याने वाटप करण्याकरिता निविदा मागवून सदर भूखंड उच्चतम पात्र निविदाकार मे. लोढा क्रॉऊन बिल्टमार्ट प्रा. लि. यांना ६५ वर्षासाठी अधिमूल्य आकारुन

भाडेपट्टयाने वाटप केला आहे. सदर भूखंडाचे वाटप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) अधिनियम, १९७७ (सुधारित १९९७) अंतर्गत केला आहे. विषयांकीत भूखंडामधील प्राधिकरणाला एकुण रुपये ४१७६.५७ कोटी (डिफर्ड पेमेन्ट व्याजासह) इतके अधिमूल्य प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यांपैकी आतापर्यंत रुपये २९३३.६७ कोटी प्राधिकरणास प्राप्त झाले असुन उर्वरीत अधिमूल्याची रक्कम पुढील तीन वार्षिक हप्त्यामध्ये प्राप्त होणे अपेक्षित आहे.

---

**पुणे ग्रामीण (जि.पुणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वायसीएम रुग्णालयात सन २००९ पासून सुमारे ८८ व्हिसेरा पडून असल्याबाबत**

**(१६) १०४९२९ (०७-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे ग्रामीण (जि.पुणे) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वायसीएम रुग्णालयात सन २००९ पासून सुमारे ८८ व्हिसेरा पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हिसेरा काढल्यानंतर तो सडू नये म्हणून त्यामध्ये रसायन टाकले जात असल्यामुळे जास्तीत जास्त तीन महिने तो टिकू शकतो परंतु त्यानंतर केलेल्या व्हिसेराच्या तपासणीत काहीच निष्पन्न होत नसल्यामुळे मृत व्यक्तीला दगाफटका झाला असल्यास त्याला न्याय मिळणे कठीण होत असल्याने व्हिसेरा वेळेत तपासणीकरीता न देणे म्हणजे पुरावा नष्ट करण्यासारखेच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वायसीएममधील व्हिसेरा न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी दिलाच जात नसल्याने व्हिसेरा पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून व्हिसेरा वेळच्या वेळी पाठविण्यासंदर्भात तसेच प्रलंबित व्हिसेराबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०५-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) • वायसीएम रूग्णालयातील पोस्ट मार्टम सेंटर येथे पुणे शहर व हद्दीतील रुग्णांचे शवविच्छेदन केले जाते.

• शवविच्छेदन केल्यानंतर राखून ठेवण्यात आलेल्या व्हिसेरा तुरंत संबंधित पोलिसांना दिला जातो.

• या प्रक्रियेत व्हिसेराचे नुकसान होऊ नये या उद्देशाने पोलिसांकरीता रूग्णालयातील स्वतंत्र खोली उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

• शवविच्छेदन केल्यानंतर राखून ठेवण्यात आलेल्या व्हिसेरामध्ये रसायन टाकले जाते. त्यामुळे जरी तपासणी करीता विलंब झाला तरी तपासणीकरीता अडचण येत नाही. परंतु काही प्रकरणांमध्ये फार उशीर झाल्यास तपासणीत काहीच निष्पन्न होऊ शकत नाही, हे काही अंशी खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

• मृत व्यक्तीचे शवविच्छेदन झाल्यानंतर लगेचच व्हिसेरा संबंधित पोलिसांच्या ताब्यात दिला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मरोळ (मुंबई) येथील सेव्हन हिल्स रुग्णालयातील ५० डॉक्टरांना सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(१७) १०५४५२ (०७-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ (मुंबई) येथील सेव्हन हिल्स रुग्णालयातील ५० डॉक्टर गत सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने संपावर गेल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टर संपावर गेल्यावर रुग्णालयाच्या कामकाजावर परिणाम होऊन बाहयरुग्ण विभागही बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार डॉक्टराचा तात्काळ वेतन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१९) :** (१) सेव्हन हिल्स रुग्णालयातील डॉक्टर्स माहे जानेवारी, २०१८ मध्ये संपावर गेले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

मरोळ येथील सेव्हन हिल रुग्णालयातील डॉक्टरांनी केलेल्या संपामुळे बाहयरुग्ण विभाग बंद पडला नसून, तो अद्यापि कार्यरत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिका आणि सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा. लि. यांचेमध्ये करण्यात आलेल्या करारातील कलम २७(एफ) अन्वये सेव्हन हिल्स रुग्णालयाचे प्रचलनासाठी आवश्यक तो कर्मचारीवृंद नेमणे व त्यांचेशी संबंधित इतर सर्व बाबींची जबाबदारी ही सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा.लि. यांची आहे.

सदर रुग्णालयातील संपकरी डॉक्टर्स व रुग्णालय प्रशासन यांचेतील वाद न्यायप्रविष्ठ आहे.

---

## कोल्हापूर जिल्हा परिषद येथे प्रयोगशाळा स्थापनेस परवानगी मिळणेबाबत

**(१८) १०५४८६ (२८-०३-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषद येथील बांधकाम साहित्याची चाचणी करण्याकरीता जिल्हा परिषदेच्या मालकीच्या प्रयोगशाळा स्थापनेचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मालकीच्या प्रयोगशाळा स्थापनेचा प्रस्ताव मान्यतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात नोंदणी झालेल्या कामगारांच्या नांदणीचे नुतनीकरण करण्याबाबत

**(१९) १०८८२५ (०६-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इमारत बांधकाम व अन्य बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या आणि शासनाकडे नोंद असणाऱ्या बांधकाम कामगारांना आवश्यक साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात ६० हजार कामगारांची नोंदणी आहे, परंतु नोंदणीचे नुतनीकरण न झाल्यास सुमारे १३ हजार कामगारांनाच या अनुदानाचा लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०५-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

शासनाने दिनांक १ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत एकूण ५८,८८० कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी १९,०००

कामगारांची नोंदणी जिवित आहे. कोल्हापूर कार्यालयामार्फत आतापर्यंत १८,८६५ पात्र बांधकाम कामगारांना विविध योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थी अर्जांवर कार्यवाही करुन लाभ वाटप करण्याचे काम सुरु आहे.
(३) बांधकाम कामगाराने लगतच्या वर्षात ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर अनुज्ञेय लाभ वितरीत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कन्नड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) विविध ग्रामपंचायतींनी दिलेल्या मजूर प्रमाणपत्रापैकी कही प्रमाणपत्रे बनावट असल्याबाबत**

**(२०) ११०७२२ (१४-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद कामगार उपायुक्त कार्यालयात दाखल झालेल्या आणि कन्नड तालुक्यातील (जि. औरंगाबाद) विविध ग्रामपंचायतींनी दिलेल्या ४६ मजूर असल्याच्या प्रमाणपत्रांपैकी ४२ प्रमाणपत्र बनावट असल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथे बनावट प्रमाणपत्र बनवणारी टोळीच कार्यरत असण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने येथील बनावट प्रमाणपत्र बनवून देणा-या टोळीचा शोध घेऊन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
औरंगाबाद कामगार उप आयुक्त कार्यालयात कन्नड तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या नावे दिलेल्या ४६ प्रमाणपत्रांची खातरजमा केली असता त्यातील ६ प्रमाणपत्रे संबंधीत ग्रामसेवकांनी अदा केली आहेत. तर ४० प्रमाणपत्रे ग्रामसेवकांनी अदा केली नसल्याचे निदर्शनास आले.
(२) व (३) बनावट प्रमाणपत्र तयार करणे प्रकरणी पोलीस यंत्रणेमार्फत शोध घेऊन कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद, यांना दि.३ ऑगस्ट, २०१८ व ४ ऑक्टोबर,२०१८ रोजीच्या पत्रान्वये आणि प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांना दि.१४ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील झोपड्यांवर बांधलेल्या पोटमाळ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२१) ११६५६१ (०३-०८-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी, सहारगांव, मरोळ, लेलेवाडी, पार्ले, बामनपाडा, सांताक्रुझ, आग्रीपाडा, लंकानगर, गावदेवी, कालिना, जांभळीपाडा, कुर्ला बैलबाजार, क्रांतीनगर आदि परिसरातील झोपडयांच्या पोटमाळयावर कारवाई करण्याची जबाबादारी एमएमआरडीए आणि जीव्हीके कंपनीकडे देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारवाईमुळे हजारो कुटूंबे बेघर होणार असल्याने महानगरपालिकने सर्व्हे करुन उक्त बाधीत कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधीत कुटूंबाचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१९) :** (१) रिट पिटीशन क्र. २१९/२०१५ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक १९.०८.२०१५ रोजीच्या आदेशानुसार मे, २००९ नंतर छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्रामध्ये नव्याने होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत एमआयएएल यांनी प्राधिकरणास आवश्यक ते तपशील सादर केल्यानंतर प्राधिकरणाने सदर अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनिमय, १९६६ च्या तरतुदीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावयाची आहे तर अतिक्रमणे जमीनदोस्त करण्याची जबाबदारी एमआयएएल अथवा भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाची आहे. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने प्राधिकरणामार्फत छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांची हाताळणी करण्यात येत आहे.

(२) अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आदेश नियोजन प्राधिकरणास म्हणजे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आहेत. प्राधिकरणाकडे अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पुनर्वसनाबाबत मागणी प्राप्त झालेली नसल्याचे संबंधित प्राधिकरणाकडून कळविण्यात आलेले आहे

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोगेश्वरी (मुंबई) येथील बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रुग्णालयात**
**रुग्णाच्या डोळ्याला उंदराने चावा घेतल्याबाबत**

**(२२) ११६६६५ (२३-०७-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणामूळे रुग्णालयात दाखल केलेल्या परमिंदर गुप्ता या रुग्णाच्या डोळ्याला उंदराने चावा घेवून कुरतडल्याची घटना दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्ण हा कोमात होता व डोळ्याला चावा घेतल्याने काही दिवसानंतर रुग्णाचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणास जबाबदार असलेल्या संबंधित रुग्णालय, डॉक्टर व कर्मचारी यांचावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१९) :** (१) व (२) मुंबईतील जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर रुग्णालय दाखल परमिंदर गुप्ता हा रुग्ण कोमात होता ही वस्तुस्थिती आहे.
परंतु, त्याच्या डोळ्याला उंदिराने चावा घेतल्याने काही दिवसांनंतर त्याचा मृत्यू झाला हे खरे नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून साहित्य खरेदी करणा-या शेतक-यांना अद्याप अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(२३) ११९४७० (३०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून साहित्य खरेदी करणा-या शेतक-यांना अद्याप अनुदान मिळाले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, खरीप हंगाम तोंडावर येऊनही अनुदान मिळाले नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सेस फंडातून मिळणारे अनुदान तात्काळ शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१९) :** (१) नाही, जिल्हा परिषद सेस फंड योजना २०१८-१९ अंतर्गत कृषि विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ मार्फत ९०% अनुदानावर आत्महत्याग्रस्त शेतक-यांना बियाणे वाटप योजनेमध्ये ९८९ शेतक-यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्यात आले. ७०% अनुदानावर सर्वसाधारण शेतक-यांना बियाणे वाटप योजनामध्ये १९६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्यात आले.

३१ मार्च २०१८ पर्यंत साहित्य खरेदी करू न शकलेल्या शेतक-यांना २०१८-१९ मध्ये साहित्य खरेदीची परवानगी दिली गेली.

(२), (३), (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा व मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील वीटभट्टयांमुळे होत असलेले प्रदुषण**

**(२४) ११९७२७ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा व मेहकर (जि.बुलढाणा) परिसरात वीटभट्टयांच्या प्रदूषणामुळे परिसरातील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१३-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) दि. ०४.०७.२०१८ व दि. ०५.०७.२०१८ रोजी म.प्र.नि. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी मोताळा व मेहकर, जिल्हा बुलडाणा परिसरातील, ग्रामीण क्षेत्रातील पारंपारिक विट भटटयांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली असता विट भटटया बंद स्थितीत आढळल्या.

(३) म.प्र.नि. मंडळाने महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक विट भटटया (स्थान निश्चिती व उद्‌योग उभारणी) नियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुपालनाबाबत उप विभागीय दंडाधिकारी मेहकर व बुलडाणा जि. बुलडाणा यांना कळविले असून, त्यांचे कार्यक्षेत्रातील विट भटटी धारकाना परवानगी देताना त्यामध्ये अधिसुचनेतील तरतुदींचे अनुपालन करण्याबाबतची अट नमुद करण्यात यावी असे कळविले आहे.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरासाठी शुध्द पाणी पुरवठा करणा-या जलशुध्दीकरण केंद्राबाबत**

**(२५) १२११९५ (२३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरासाठी शुध्द पाणी पुरवठा करणा-या जलशुध्दीकरण केंद्र तयार असूनही गत तीन वर्षापासून दुर्लक्षीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील गावांच्या समृध्दीसाठी तसेच पाणी टंचाई दूर करण्यासाठी युवक व नागरिकांनी पाणी फाऊंडेशनची माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थापना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या फाऊंडेशनमार्फत आतापर्यंत कोणते उपक्रम राबविण्यात आले, त्याची फलश्रृती काय आहे तसेच इचलकरंजी शहरातील जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) • केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सूविधांचा विकास (युआयडीएसएस एमटी) योजनेअंतर्गत इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण झाले असून, त्यामध्ये समाविष्ट जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत झालेले आहे.
• महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करणे या हेतुने जल व मृदसंधारणाची कामे जनसहभागातून करण्याच्या अनुषंगाने पाणी फाऊंडेशन ही अशासकीय यंत्रणा कार्य करीत आहे. या यंत्रणेमार्फत राज्यातील ग्रामीण भागामध्ये जनसहभागातून जलसंधारणाची कामे करण्याच्या अनुषंगाने वॉटरकप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.
• कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील गावांतील नागरिकांकडून पाणी फाऊंडेशनची स्थापना करण्यात आलेली नाही.

---

## राज्यातील मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांसाठी विनावापर इमारती तसेच जमीन देण्याबाबत

**(२६) १२२३३२ (२०-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विनावापर असलेल्या इमारती तसेच महसूल विभागाची पडिक जमिन देण्याबाबत शासनाने सर्व जिल्हाधिका-यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांसाठी नाशिक यथील जागा उपलब्ध करून देण्यासाठी वारंवार विनंती करूनही जिल्हाधिकारी, नाशिक यांनी जमीन उपलब्ध करून दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांसाठी नाशिक यथील जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१) अशी बाब नाही, असे जिल्हाधिकारी नाशिक यांनी कळविले आहे.

(२) व (३) मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक वस्तीगृह बांधण्यासाठी मौजा नाशिक येथील भू.क्र.७१८ मधील जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे प्राप्त झाली होती. दरम्यान शासन पत्र क्र. मुदत २०१८/ २६७/ प्र.क्र.४२/ नाजकधा-२, दि.०९.०८.२०१८ नुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांना नाशिक येथील स.नं.७१८/१३अ/१ब/३/१०, प्लॉट नं.१० मधील ८५८.०३ चौ.मी. एवढे क्षेत्र शासकीय वस्तीगृहाच्या बांधकामासाठी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे.

तसेच सदर मिळकतीच्या इतर हक्कात "शासकीय वस्तीगृहासाठी राखीव क्षेत्र-८५८.०३ चौ.मी." अशी नोंद घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मानखुर्द (पूर्व) येथे महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेस सदनिका देण्याबाबत

**(२७) १२६३०९ (३०-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द (पूर्व) येथे महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेस ४९०० सदनिका मंजूर असून त्यापैकी ५४ सदनिका देण्याबाबत मा.गृहनिर्माण मंत्री यांनी दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेने सन २०११ मध्ये शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादा योजनेअंतर्गत रुपये २३ कोटी ६४ लाख इतकी रक्कम जमा केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेच्या जमा रकमेवर १७% व्याज महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना अद्यापपर्यंत सदनिका वितरीत केल्या नसल्याची लेखी तक्रार सभासदांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच उर्वरित ३७२४ सदनिकांच्या वाटपाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदर संस्थेस ४९०० सदनिका मंजूर असल्याचे विधान देखिल खरे नाही. तत्कालिन मा. मुख्यमंत्री महोदयांकडील दिनांक ४ जून, २००८ च्या बैठकीत त्यावेळी उपलब्ध असलेल्या केवळ ११८२ सदनिका देण्याचा निर्णय झालेला आहे.

(२) सदर संस्थेने एकूण रु. २३ कोटी ६४ लाख रक्कम शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडे जमा केल्यावर त्या संस्थेस एकूण ११८२ पैकी भोगवटा प्रमाणपत्र उपलब्ध झालेल्या ११२८ सदनिकांचा ताबा त्यावेळी देण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) दिनांक ०४.०६.२००८ रोजीच्या तत्कालीन माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीत ठरल्यानुसार शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेडकडून ११२८ सदनिकांचा ताबा महात्मा फुले सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात आलेला आहे. तर उर्वरित ५४ सदनिकांचा ताबा भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याने देण्यात आला नाही.

तथापि, ११२८ सदनिकांचा ताबा देताना विहित केलेल्या अटींची पूर्तता केली नसल्याचे व सदर सदनिकांचे बेकायदेशीररित्या वाटप केल्याचे निदर्शनास आल्याने यापुढे सदर संस्थेस ऊर्वरित सदनिकांचे वाटप करण्यात येऊ नये; किंबहुना, त्यांना यापूर्वी वाटप केलेल्या ११२८ सदनिका त्यांच्याकडून काढून घेण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्याबाबत तसेच, शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई तात्काळ करण्याबाबत शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या. यांना शासन स्तरावरुन कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माओवादी संघटनांशी संबध असल्याच्या संशयावरुन पाच जणांना झालेली अटक**

**(२८) १२६४२४ (०६-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माओवादी संघटनांशी संबंध असल्याच्या संशयावरुन ढवळे, गडलिंग, राऊत, सेन, विल्सन यांना केलेल्या अटकेस दिनांक ३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास ९० दिवस पूर्ण होत असूनही अद्यापपर्यंत पोलिसांमार्फत दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या आरोपींना जामिन मिळण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांकडून अद्यापपर्यंत दोषारोपपत्र दाखल करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१९) :** (१) हे, खरे नाही.
(२), (३) व (४) सदर गुन्हयातील (१) सुधीर प्रल्हाद ढवळे (२) रोना विल्सन (३) सुरेंद्र पुंडलिकराव गडलिंग (४) शोमा सेना (५) महेश सिताराम राऊत यांचे विरुध्द विहीत मुदतीत दिनांक १५.११.२०१८ रोजी दोषारोपपत्र मा . विशेष न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय शिवाजीनगर, पुणे यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले असून त्याचा ओ.टी.एस. कोर्ट केस नंबर ०१/२०१८ असा आहे. सर्व आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत येरवडा कारागृहात आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई, ठाणेसह राज्यातील सुमारे १ लाख ३० हजार सामाजिक संस्थांचे प्रस्ताव धर्मादाय आयुक्तांनी रद्द केल्याबाबत**

**(२९) १२६४६४ (०५-१२-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासह मुले-महिला आणि मानवी हक्काबाबत कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनी वार्षिक टाळेबंद वेळेवर न देणे, नोंदणीकृत असूनही सामाजिक संस्थांचे अहवाल सादर न करणे, अहवालामध्ये त्रुटी ठेवणे या कारणासाठी धर्मादाय आयुक्तांनी मुंबई, ठाणेसह राज्यातील सुमारे १ लाख ३० हजार सामाजिक संस्थांचे परवाने रद्द केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थांची परवाने शासनाने रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्यांची जिल्हानिहाय संख्या काय आहे,

(३) असल्यास, सदर संस्थांनी संस्थांच्या अनियमित कामकाजाच्या अनुषंगाने संस्थाचालक व सदस्य यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, धर्मादाय आयुक्त कार्यालयात माहे ऑक्टोबर २०१८ अखेरपर्यंत शासनाकडे एकूण किती प्रस्ताव चेंज रिपोर्ट, पुनर्विकास परवानगी व सुनावणी कार्यवाहीसाठी अद्याप प्रलंबित आहेत,

(५) असल्यास, शासनाने आवश्यक ती रिक्त पदे भरुन, सदरहू प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील सुधारीत कलम २२ (३अ) नुसार नोंदणी रद्द करण्याबाबतची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

(१) विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनाची संपूर्णपणे पूर्ती झालेली असणे, (२) विश्वस्त व्यवस्थेचे प्रयोजन बेकायदेशीर झालेले असणे, (३) विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता नष्ट केल्यामुळे अथवा अन्यथा तिच्या प्रयोजनाची पूर्ती करणे अशक्य झालेले असणे, (४) विश्वस्त व्यवस्था रद्द करण्यायोग्य असल्यामुळे, ती व्यक्तपणे रद्द केलेली असणे, (५) विश्वस्त व्यवस्थेच्या हेतूपूर्तीसाठी विश्वस्त कोणतेही कार्य करीत नसल्याचे आढळून आलेले असणे, (६) विश्वस्तांनी गेल्या पाच वर्षांची हिशोबपत्रके सादर न करणे.

ऑगस्ट, २०१८ पर्यंत रद्द केलेल्या संस्थांची जिल्हानिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.:-

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | रद्द केलेल्या न्यासांची संख्या |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | ९३५७ |
| २ | ठाणे | ९०८२ |
| ३ | रायगड | १८ |
| ४ | नाशिक | २८३३ |

| | | |
|---|---|---|
| ५ | धुळे | ४९२३ |
| ६ | जळगांव | ५६०७ |
| ७ | नंदूरबार | १९३४ |
| ८ | पुणे | ४९०१ |
| ९ | अहमदनगर | २३७० |
| १० | सातारा | ५२६६ |
| ११ | सोलापूर | १२९३ |
| १२ | कोल्हापूर | ६४७० |
| १३ | सांगली | १३१० |
| १४ | रत्नागिरी | ४८९ |
| १५ | सिंधुदुर्ग | ७३५ |
| १६ | औरंगाबाद | ६००४ |
| १७ | जालना | ३०७५ |
| १८ | परभणी | ३६३३ |
| १९ | नांदेड | ८८८८ |
| २० | हिंगोली | १५०० |
| २१ | लातूर | ६३४५ |
| २२ | उस्मानाबाद | २५१८ |
| २३ | बीड | ५९१८ |
| २४ | अमरावती | ७२१७ |
| २५ | अकोला | ३७८५ |
| २६ | बुलढाणा | ६११ |
| २७ | यवतमाळ | ३०७१ |
| २८ | वाशिम | २६७२ |
| २९ | नागपूर | २७५१ |
| ३० | वर्धा | ३५६५ |
| ३१ | भंडारा | १४७६ |
| ३२ | चंद्रपूर | ४८८४ |
| ३३ | गडचिरोली | ४८११ |
| ३४ | गोंदिया | ३४० |
| एकूण | | १२९६५२ |

(३) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील सुधारीत कलम २२ (३अ) नुसार कार्यवाही करण्यात आली असून, प्रामुख्याने ज्या संस्थांनी / विश्वस्तांनी गेल्या ५ वर्षाची हिशोबपत्रके सादर केलेली नाहीत अशा संस्थांची विभागनिहाय माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या यादीस ३० दिवसांचा कालावधी झाल्यानंतर अकार्यरत संस्था स्वयंखुद्द बदल अर्जाद्वारे रद्द करण्याबाबतची प्रक्रिया धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

(४) धर्मादाय संघटनेतील सर्व जिल्हा कार्यालयात माहे नोव्हेंबर,२०१८ अखेरपर्यंत प्रलंबित असलेले कलम २२ अन्वयेचे एकूण ३७३२८ इतके चेंज रिपोर्ट / बदल अर्ज आहेत. तसेच कलम ३६ अन्वयेची एकूण ४५७ इतकी प्रकरणे (वाद असलेले ८५ आणि वाद नसलेले ३७२) धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित आहेत.

(५) व (६) धर्मादाय संघटनेतील कार्यालयातील बदल अर्जाचा निपटारा त्वरीत होण्यासाठी गट अ, ब, क, ड या संवर्गातील ७४३ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

## कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामामुळे दक्षिण मुंबईतील ध्वनी पातळीत वाढ झाल्याबाबत

**(३०) १२६५१० (२९-१२-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा ते सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामामुळे दक्षिण मुंबईतील ध्वनी पातळी कमाल मर्यादेपेक्षा अधिक असल्याचे महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे ऑगस्ट, २०१८ च्या सुमारास मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा कोणता परिणाम होणार आहे,

(४) असल्यास, यासंदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

**श्री. रामदास कदम (१३-०६-२०१९) :** (१) होय.

(२) सदर अहवालामध्ये मुंबई मेट्रोरेल महामंडळातर्फे मुंबई येथे प्रकल्प ३ यांच्याकडुन ध्वनी प्रदुषण सहनियंत्रणासाठी घ्यावयाच्या उपाययोजना नमुद केल्या आहेत.

(३) या अहवालाचा उद्देश व व्याप्ती ही नागरिकांवर ध्वनी प्रदुषणाचा आरोग्यावर होणारा परिणाम तपासणे नसून, प्रामुख्याने, मेट्रोरेल उभारणीच्या गतिविधींमुळे सभोवतालच्या परिसरातील ध्वनीच्या पातळीवर होणारा परिणाम अभ्यासणे ही होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेतील गट अ, ब संवर्गातील मागासवर्गीयांचा**
**५० हजार पदांचा अनुशेष भरण्याबाबत**

**(३१) १२६६८१ (०५-१२-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील गट अ ते गट ब या संवर्गातील १ लाख १२ हजार पदांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीय यांचा सुमारे ५० हजार पदांचा अनुशेष न भरल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचबरोबर शासकीय सेवेत खुल्या प्रवर्गातील गट अ ते गट ड पर्यंतच्या सुमारे ७२ हजार जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या सेवेतील नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांची रिक्त पदे आढळून आल्यास विशेष मोहिम राबवून ती भरण्याची शासनाची जबाबदारी असतानाही गत ४ वर्षात मागाससवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी एकदाही विशेष मोहिम राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१९) :** (१) ऑगस्ट, २०१८ अखेर राज्यात गट अ व गट ब ची सरळसेवा व पदोन्नतीची एकूण १६९९५२ मंजूर पदे आहे. त्यापैकी मागासवर्गीयांची ८२१९६ मंजूर पदे असून त्यापैकी ५०६७० पदे भरलेली आहेत व सुमारे ३१५२६ पदे रिक्त आहेत.

(२) शासकीय सेवेत खुल्या प्रवर्गातील गट अ ते गट ड पर्यंतच्या सुमारे १ लाख जागा रिक्त आहेत.

(३) होय.

(४) व (५) वेतनावरील खर्चावर नियंत्राण करण्याकरीता शासन निर्णय वित्त विभाग क्र. २०१५/प्र.क्र ४१/ अर्थ-१ दिनांक २ जून, २०१५ सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० % किंवा एकूण संवर्गाच्या ४ % ज्यापैकी कमी असतील इतकी पदे भरण्यात यावी .अशा प्रकारचे निर्बंध घातले आहेतसेच पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मागासवर्गीय कोट्याची पदे भरता आली नाहीत. तथापि ज्येठतेनुसार खुल्या प्रवर्गातील पदांवर मागासवर्गीयांना प्रतिनिधित्व देण्यात येते. मात्र आता सरळसेवेची रिक्त पदे मोठया प्रमाणात भरण्याच्या दृष्टीने शासनाने महाभरती घोषित केली असून सदर भरतीत अनुशेषाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

### मुंबईतील वाहतुकीची समस्या सोडविण्याबाबत

**(३२) १२६८७६ (३०-११-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दक्षिण मुंबईसह पश्चिम द्रुतगती महामार्ग, लिंकरोड, एस.व्ही. रोड, एल.बी.एस. मार्ग, सर्व उड्डाण पूल, मुंबईतील प्रवेशद्वारे येथे वाहनांची प्रचंड रांग, त्यात मेट्रोच्या कामाची भर पडल्याने अरुंद झालेल्या रस्त्यांवर तसेच दक्षिण मुंबईतील पेडर रोडसह नरिमन पॉईंट, हाजीअली, वरळी, प्रभादेवी, दादरपर्यंत सर्वच रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहतुकीची समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१९) :** (१) मुंबई शहरामध्ये सुरू असलेल्या मेट्रोच्या कामामुळेच वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे नाही. मुंबई शहरातील वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी ही प्रामुख्याने मुंबई शहरातील वाहनांची मोठया प्रमाणात वाढती संख्या, व त्याप्रमाणात मुंबई शहरातील असलेले अरुंद रस्ते या कारणांमुळे होत आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई वाहतुकीच्या रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी नियमनासाठी वाहतूक शाखेकडून नियमितपणे वाहतूक पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात येते.तसेच एमएमआरडीए, एमएसआरडीसी, पीडब्ल्यूडी, एमसीजीएम, एमजीएल या प्राधिकरणाकडून वाहतुकीच्या रस्त्यांवर होत असलेल्या कामाचे अनुषंगाने त्यांच्याशी वेळेवेळी समन्वय

ठेऊन वाहतूक कोंडी होवू नये यादृष्टीने वाहतूकीचे नियमन करण्यात येते. मुंबईतील वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे रस्त्यांवर होणारी वाहतूकीची कोंडी होऊ नये, तसेच सुरळीत राहण्याच्या दृष्टीने मुंबई शहर वाहतूक शाखेकडून वेळेवेळी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

---

**मुंबईतील विहिरींची झालेली दुरवस्था**

**(३३) १२७३४४ (०६-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील विलेपार्ले पूर्व येथील रुईया बंगल्याजवळ विश्वकर्मा पूजा करित असतांना विहिरीचा स्लॅब कोसळून तीन महिलांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेवरून कब्जेदारांचे दुर्लक्ष आणि शासकीय यंत्रणांमधील वाद यामुळे शहरातील विहिरींची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेनंतर मुंबईतील उघड्यावर असलेल्या विहिरींचा प्रश्न निर्माण झाला असून विहिरींमधून दररोज लाखो लिटर पाण्याचा उपसा टँकर लॉबी करित असल्यामुळे विहिरी कमकुवत होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील विहिरी, तळी आदी नैसर्गिक जलस्रोतांच्या संवर्धनाबाबतच्या नियमांची अंमलबजावणीबाबत महानगरपालिका व जिल्हाधिकारी यांमध्ये संगनमत नसल्याने शहरातील एकूण चार हजार विहिरींच्या सुरक्षिततेचा प्रश्न समोर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयात अपुरे मनुष्यबळ असून मुंबईत पाणीपुरवठ्याची जबाबदारी पार पाडत असलेल्या महानगरपालिकेवर विहिरींबाबतच्या नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील असुरक्षित विहिरींच्या समस्येवर उपायोजना करण्याकरिता शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०४-२०१९)** : (१), (२) व (३) विहिरींची देखभाल व सुरक्षितता मालकांकडून करण्यात येते.

काही विहिर मालकांनी उघडया विहिरी आच्छादित करुन सुस्थितीत परिरक्षित केल्या असल्याचे तसेच, विंधन विहिरी (कुपनलिका) व कंगण विहिरी (रिंग वेल) या त्यांच्या मालकांतर्फे सुस्थितीत परिरक्षित केल्या असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या सर्व विहिरींची यादी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, ठाणे यांना ई-मेलद्वारे कळविण्यात आली असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वायू प्रदुषणाबाबत कृती योजनेचा आराखडा तयार करण्यास होत असलेला विलंब

**(३४) १२७७५७ (२९-१२-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने दहा महिन्यापूर्वी शासनाला वायू प्रदुषणाबाबत कृती योजनेचा आराखडा तयार करण्याचा आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कृती योजनेचा आराखडा शासनाने अद्यापही तयार केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त आराखडा तयार न करण्याची कारणे काय आहेत व आराखडा तयार करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम (१३-०६-२०१९) :** (१) अध्यक्ष, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी १ जुलै २०१६ अन्वये राज्यातील १७ प्रदूषित शहरांचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत हवा (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१, कलम क्रमांक १८ (१) (ब) अन्वये निर्देश दिले होते व त्या बाबत कृती आराखडा तयार करण्यास सांगितले होते. हे खरे आहे.
(२) त्यानुसार म.प्र.नि.मंडळाने नीरी, नागपूर व आय.आय.टी, मुंबई यांच्यासमवेत संबंधित १७ शहरातील भागधारकांसोबत वेळोवेळी बैठका घेऊन, १७ शहरांच्या महानगरपालिकेने तयार केलेला सर्वसमावेशक हवा प्रदूषण नियंत्रण आराखडा पुढील मार्गदर्शनाकरिता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय निमशासकीय सेवांमधील ओबीसी प्रवर्गासाठी राखीव व कार्यरत पदांचा आढावा घेवून या प्रवर्गाचा अनुशेष भरण्याची विशेष मोहीम राबविण्याबाबत

**(३५) १२७९६७ (३०-११-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय निमशासकीय सेवेत १९ टक्के प्रमाणे २ लाख ९ हजार ओबीसी अधिकारी-कर्मचारी कार्यरत असणे अपेक्षित असतांना सद्या केवळ ८.४५ टक्के उमेदवार कार्यरत असल्याचे माहे ऑगस्ट मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शासकीय निमशासकीय सेवांमधील ओबीसी प्रवर्गासाठी राखीव व कार्यरत पदांचा आढावा घेवून या प्रवर्गाचा अनुशेष भरण्याची विशेष मोहीम राबविण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व इमाव, विजाभज व विमाप्र मंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१९) :** (१) नाही, राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत १५.३९ टक्के इतके ओबीसी कर्मचारी माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये कार्यरत असल्याचे विभागात प्राप्त माहितीनुसार दिसून येते.
(२) होय.
(३) राज्यात शासकीय निमशासकीय सेवांमधील रिक्त पदे भरताना अनुशेषाची रिक्त पदे प्राथम्याने भरण्यात येतात. राज्यातील रिक्त पदे मोठया प्रमाणात भरण्याच्या दृष्टीने शासनाने महाभरती घोषित केली असुन सदर भरतीत अनुशेषाची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शहर स्वच्छतेचे अल्प उत्पन्नात काम करणा-या कचरावेचक महिलांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३६) १२८१३३ (०६-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शहर स्वच्छतेचे अल्प उत्पन्नात काम करणा-या कचरावेचक महिलांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सद्या अस्तित्वात असलेल्या योजना अत्यंत अपु-या पडत असल्याने काही नविन उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्यातील नागरी स्थानिक संस्थांचे क्षेत्रात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन, वाहतूक व प्रक्रीया या कामात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे सफाई

कामगारांसोबतच असंघटित क्षेत्रातील कचरा वेचक यांचा सहभाग घेण्यात येतो. या कचरा वेचकांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पुढील प्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत :-

१) शहरातील सर्व कचरा वेचकांचे सर्वेक्षण करुन त्यांना ओळखपत्र देण्यात आली आहेत.

२) कचरा वेचकांना शहरातील कचरा विलगीकरण केंद्रवर (MRF) जागा तसेच शहरातील घंटागाडीवर काम करण्यास मुभा देण्यात आली आहे.

३) कचरा वेचकांना हे काम करण्यासाठी त्यांना वैयक्तीक सुरक्षेची साधणे (PPE) (उदा. गणवेश, मास्क, हातमोजे, गमबूट, जॅकेट इत्यादी) देण्यात येतात.

४) शहरातील संकलित होणाऱ्या सुक्या कचऱ्यामधील जो कचरा पुनर्प्रक्रियेसाठी योग्य आहे असा कचरा कचरावेचकांना घेऊन जाण्यास मुभा देण्यात येते ज्या योगे हा कचरा विकून त्यांना उत्पनाचे साधन उपलब्ध होवू शकेल.

५) दिनदयाल उपाध्याय अंत्योदय योजना यासारख्या योजनांबरोबरच अपघात विमा, आयुर्विमा, उज्वला व सौभाग्य योजनांचा लाभ देण्यात येतो.

६) या व्यतिरिक्त राज्य शासनामार्फत सध्या कोणत्याही नविन सुविधा उपलब्ध करुन देण्याचे विचाराधीन नाही.

---

**मालाड (पश्चिम) (मुंबई) येथील गुडलक रसायन कंपनी स्प्रे मेंटीग कारखाना सोमवार बाजार कंपनीला लागलेल्या आगीबाबत**

**(३७) १२८५३० (०७-१२-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पश्चिम) (मुंबई) येथील गुडलक रसायन कंपनी स्प्रे मेंटीग कारखाना सोमवार बाजार येथिल कंपनीला दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीत जिवीत व वित्त हानी झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात यावेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर आगीत जीवित हानी झाली नाही.

तथापि, इलेक्ट्रींग वायरींग, फर्निचर, संगणक, प्लास्टिक रॉ मटेरियल, विंडो ए. सी. इत्यादी वस्तु जळून नष्ट झाल्या.
(३) सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर आगीचे कारण “सदोष विद्युत प्रणाली” असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी शहरातील कल्याण- साईबाबा या मार्गावर व रांजनोली नाका (ता.भिवंडी) येथे एमएमआरडीएच्या माध्यमातून उड्डाणपूलाचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(३८) १२९५२१ (०६-१२-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहरातील कल्याण-साईबाबा या मार्गावर व रांजनोली नाका (ता.भिवंडी) येथे एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येणारे उड्डाणपूलाचे काम गत चार वर्षापासून संथ गतीने सुरु असल्याने या ठिकाणी नेहमी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने सदरच्या उड्डाणपुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत वारंवार निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास ठाणे पोलिस आयुक्त तसेच संबधित अधिका-यांना लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१) या संदर्भात निवेदन प्राप्त झालेले नसल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व ठाणे पोलीस आयुक्त यांनी कळविले आहे.
(२) व (३) भिवंडी शहरातील कल्याण भिवंडी मार्गावरील पुलाच्या कामास गती देण्यात आली आहे. राजणोली येथील उजव्या बाजूचे (मुंबई-नाशिक दिशेकडील) काम ठेकेदार मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्याकडून काढून घेण्यात आले असून नविन कंत्राटदार नेमण्याकरीता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे तसेच कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. उर्वरीत काम मे. सुप्रिम इनफ्रास्ट्रक्चार लि. यांच्याकडून प्रगतीपथावर आहे.

---

**ठाणे येथील कळवा-ऐरोली येथील सुमारे २१०० झोपड्यांचे पुनर्वसन केले नसल्याबाबत**

**(३९) १२९६८७ (०७-१२-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील कळवा-ऐरोली रेल्वेसाठी तेथील सुमारे २१०० झोपड्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी एमएमआरडीएकडे असून भोलानगर, मफतलाल कंपनी, ठाकूरपाडा, न्यू शिवाजी नगर या भागातील जमिन महसूल विभागाने अद्यापी संपादित केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन तातडीने संपादित करण्यासाठी व झोपड्यांचे पुनर्वसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१९)** : (१) होय.
(२) व (३) सदर प्रस्तावात संपादित होणाऱ्या जमिनी या मे. मफतलाल कंपनीच्या मालकीच्या असून सदर जमिनीचा ताबा कोर्ट रिसिव्हर, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे असल्याने जमिन संपादनासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. उक्त ठिकाणावरील प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि.यांच्याकडून करण्यात आले असून त्याचा अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास क्रमांक एमआरव्हीसी/डब्ल्यू/१५०/आर आणि आर, दिनांक १५.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

जमिन संपादनाकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची परवानगी मिळणेवर प्रलंबित आहे.

---

## मागाठाणे मतदार क्षेत्रात मूलभूत सोईसुविधांच्या विकासकामांसाठी विशेष निधी उपलब्ध करणेबाबत

**(४०) १३००९२ (०५-१२-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागाठाणे मतदार क्षेत्रात मूलभूत सोईसुविधांच्या विकासकामांसाठी तसेच नागरिकांना मूलभूत/ पायाभूत सुविधा देण्याकरिता प्रस्तावित करीत असलेल्या विकास कामांना विशेष निधी उपलब्ध करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वित्त्त व नियोजन राज्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विकास कामांना विशेष निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०१९)** : (१) होय.
(२), (३) व (४) म.वि.स.स. यांनी विनंती केल्यानुसार मागाठाणे क्षेत्रातील रु.५.०० कोटीच्या विकास कामांना शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

## कांजुरमार्ग (पुर्व) कर्वेनगर येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रकल्पग्रस्तासांठी बांधण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(४१) १३०३३४ (०८-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील कांजुरमार्ग (पुर्व) कर्वेनगर येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उपविकासक मे. कॅटापुल्ट रियालिटी कन्सलटंन्ट यांच्याकडुन प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने सदर इमारतीच्या बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे तसेच मौजे हरियाली कांजुर मार्ग, पुर्व, न.भु.क्र. १२० या भूखंडावरील बांधण्यात आलेल्या प्रकल्पात मोठया प्रमाणात नियमाचे उल्लघंन केले असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनीधींनी केली असल्याचे माहे ऑगसट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट बांधकामाची आणि नियमाचे उल्लंघन झालेल्या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत स्थळपहाणी करण्यात येऊन उपविकासकास विना विनाशकारी चाचणी करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार उपविकासकाकडून विना विनाशकारी चाचणी करण्यात आली असून त्याबाबतचा स्ट्रक्चरल सल्लागाराने अहवाल प्राधिकरणास सादर केला आहे. सदर अहवालानुसार ही इमारत संकल्पित आयुष्यासाठी संरचनात्मकदृष्टया स्थिर असल्याचे नमूद केले आहे. सदर योजनेंतर्गत पुनर्वसन इमारतींचे बांधकाम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व प्राधिकरणाच्या देखरेखीखाली करण्यात आले असून बांधकामाच्या विविध टप्प्यावर वेळोवेळी बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रमाणीकरण करण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत विकास नियंत्रण नियमावलीमधील नियमन क्र.३३ (१०) मधील तरतूदींचे पालन होऊन बांधकाम झाले आहे. त्यामध्ये नियमांचे उल्लंघन झालेले नाही.

---

## शहापूर-इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील तलाव संवर्धनाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४२) १३१५४० (२९-१२-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर-इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील तलावांचे संवर्धन करण्याचा प्रस्ताव अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत सदर तलावाचे संवर्धन करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.पर्यावरण मंत्री यांनी माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे व प्रस्तावाला केव्हापर्यंत मंजुरी मिळणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१३-०६-२०१९) :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेस्तरावर सरोवर संवर्धन योजनेअतंर्गतचा विचाराधिन प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३) या संदर्भात जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून विहीत नमुन्यात प्रस्ताव प्राप्त झाल्यास मंजुरीबाबतची पुढील उचीत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्य शासनाने भूजल (विकास व व्यवस्थापन) नियम, २०१८ चे मसुदा प्रसिध्द केले नसल्याबाबत

**(४३) १३२११३ (१०-१२-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने भु-जलाचे नियमनासाठी प्रसारीत केलेल्या नविन प्रस्तावित नियमावलीचे वाचन ग्रामसभेतून न झाल्याने सर्व सामान्य जनतेत त्याचा प्रसार झाला नाही व लोकांना त्यांचे आक्षेप मांडता आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील प्रयोजने पार पाडण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक २५ जुलै, २०१८ रोजी अधिसूचना काढून भूजल (विकास व व्यवस्थापन) नियम, २०१८ हे मसुदा नियम सर्वसामान्य जनतेच्या अभिप्रायांसाठी प्रसिध्द केले होते. तसेच या नियमाचा मसुदा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

या नियमावर जनतेचे अभिप्राय उपलब्ध होण्यासाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवर नियमांचे स्वरुप सर्वसामान्य जनतेला पटवून देऊन जनजागृती करण्याचे तसेच जिल्हा, तालुका व गावपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्वसाधारण सभेत चर्चा

घडवून आणण्याविषयी आणि शेतकरी, ग्रामस्थ यांच्यासमवेत कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेण्याविषयी सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अपर मुख्य सचिव यांच्या अर्धशासकीय पत्रान्वये निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार या मसुदा नियमांबाबत ५२३७ हरकती व सूचना प्राप्त झाल्या असून ग्रामपंचायतींनी दिलेल्या हरकती व सूचनांची संख्या ११८५ आहे. ग्रामपंचायतीतून आलेल्या हरकती व सूचनांपैकी सर्वाधिक हरकती व सूचना अहमदनगर जिल्ह्यातून प्राप्त झाल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव शहरातील औद्योगिक क्षेत्राकरिता एम.आय.डी.सी स्पेशल प्लानिंग ऑथोरिटी असूनही महानगरपालिकेकडून कर वसूली होत असल्याबाबत**

**(४४) १३२५६५ (०६-१२-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील औद्योगिक क्षेत्राकरिता एम.आय.डी.सी ही स्पेशल प्लॅनिंग ऑथोरिटी असून जळगांव महानगरपालिका भूखंडधारकांकडून कर वसूली करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) तत्कालिन जळगाव नगरपालिकेची दि.११/९/१९८७ अन्वये हद्दवाढ झाल्यानंतर औद्योगिक विकास महामंडळाचे ७५२.२२ हेक्टर क्षेत्र नगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झाले आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सदर क्षेत्रातील मिळकतींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली होती.

तद्नंतर, दि.२१/०३/२००३ रोजी जळगाव नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२८ मधील तरतुदीनुसार, सदर क्षेत्रातील एकूण १७९२ मिळकतींना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कराची आकारणी करण्यात येत आहे. मात्र खुल्या भुखंडावर कुठल्याही प्रकारचा कर आकारण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील शासकीय दुध डेअरीतील दुधात भेसळ होत असल्याबाबत**

**(४५) १३२९३६ (२९-१२-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील शासकीय दुध डेअरीतील दुधात वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने रोज भुकटीमिश्रित दोन हजार लिटर पाण्याची भेसळ होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषी असलेल्यांवर कारवाई तसेच नागरीकांना सकस व चांगल्याप्रतीच्या दुधाचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) या संदर्भात मे.शासकीय दुध योजना, मुर्तीजापूर, अकोला या पेढीमध्ये कोणत्याही भुकटीची भेसळ होत असल्याचे आढळून आले नसले तरी सदर पेढीची सखोल तपासणी करण्यात आली असून पेढीमध्ये संकलित करण्यात आलेले Mixed milk (loose) व पेढीमध्ये पॅक करण्यात आलेले Pasteurised Homogenised Tone Milk (Arey Brand) या अन्न पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आलेले आहेत सदर नमुन्यांचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत.

नागरीकांना सकस व चांगल्या दुधाचा पुरवठा होण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत वेळोवेळी विशेष मोहिमा राबविण्यत येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाल (जि.नागपूर) परिसरातील चिटणीस पार्क ते अग्रसेन चौक या दरम्यान फुटपाथवर जुन्या गाड्यांची विक्री होत असल्याबाबत**

**(४६) १३३७२३ (११-१२-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाल (जि.नागपूर) परिसरातील चिटणीस पार्क ते अग्रसेन चौक या दरम्यान फुटपाथवर जुन्या गाड्यांची विक्रीचे व्यवसाय सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुकानदारांवर महानगरपालिका व वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहू अवैध दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१९) :** (१), (२), (३) व (४) • चिटणीस पार्क ते अग्रसेन चौक या दरम्यान कायमस्वरुपी अतिक्रमण नसून दोन्ही बाजूला जुन्या दुचाकी वाहनाचे खरेदी विक्रीचा व्यवसाय करणारी दुकाने आहेत.

• या दुकानदाराकडून दुकानासमोरील जागेवर/फुटपाथवर तात्पुरते अतिक्रमण केल्याचे, निदर्शनास आल्यास, अशा वेळी महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाकडून वेळोवेळी कारवाई केली जाते.

• याद्दष्टीने महानगरपालिकेकडून दिनांक २२/०३/२०१८, दि.३१/०३/२०१८, दि.१२/१२/२०१८ व दिनांक १४/०१/२०१९ रोजी या भागात अतिक्रमण काढण्याची कारवाई केलेली आहे.

---

**विरार- डहाणू रेल्वे चौपदीकरणाचे काम जलद गतीने सुरु करण्याबाबत**

**(४७) १३३९५० (०५-१२-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्चगेट- डहाणू दरम्यान उपनगरीय रेल्वे सेवेस प्रशासनाने हिरवा कंदील देण्यात आलेला आहे तसेच प्रवाशांची वाढती संख्या व जीवघेणा प्रवास लक्षात घेता विरार- डहाणू रेल्वे चौपदीकरणाचे काम जलद गतीने सुरु करण्यात यावे अशी मागणी होत असल्याचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे,

केंद्र शासनाने प्रवाश्यांची वाढती लोकसंख्या पाहता शासनाने विरार ते डहाणू या उपनगरीय रेल्वेमार्गाचे चौपदरीकरण करण्यास माहे नोव्हेंबर, २०१६ रोजी मान्यता दिली आहे.

(२) सदर प्रकल्पाच्या निर्मितीच्या अनुषंगाने नकाशे तयार करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे तसेच सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी कर्मचारीवृंद मंजूरी इत्यादी आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात येत असून, प्रकल्पासाठी लागणारे जमीन अधिग्रहण व हस्तांरणाचे काम पालघर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येत असून, ते प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील पुणे-नाशिक महामार्गावर वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी स्वतंत्र युनिट स्थापन करण्याबाबत**

**(४८) १३४०७६ (११-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील पुणे-नाशिक महामार्गावर दररोज नागरिकांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत असल्याने वाहतुक पोलिसांचे स्वतंत्र युनिट स्थापन करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या परिवहन समितीच्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण मधील अवैध प्रवासी वाहतुक,वाहनचालकांना लेनची शिस्त लावणे,रस्त्यावर पार्किग केलेले मोठे कंटेनर, रस्त्याला उलट्या दिशेने जाणारे टेम्पो यावर कारवाई करण्याची जबाबदारी स्वतंत्र युनिटची आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिवहन समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मंजूर झालेल्या स्वतंत्र युनिटच्या स्थापनेबाबतची तसेच पदभरतीची सद्यस्थिती काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन चाकण परिसरातील वाहतुक सुरळीत करण्यासाठी स्वतंत्र युनिट स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१९) :** (१) होय,
दि.१५/०८/२०१८ रोजी नव्याने निर्माण झालेल्या पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय परिक्षत्रात चाकण, ता.खेड, जि.पुणे हे एमआयडीसी शहराचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर आयुक्तालयाअंतर्गत चाकण वाहतुक विभाग दि.०६/०९/२०१८ पासून स्थापन झाले आहे.

सदर चाकण वाहतुक विभाग अंतर्गत ०१ पोलीस निरीक्षक ०१ उपपोलिस निरीक्षक, ४१ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.
(२), (३) व (४) होय.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय निर्माण झाल्यानंतर आयुक्तालय अंतर्गत चाकण वाहतुक विभाग स्थापन झाले पासुन चाकण वाहतुक विभाग बेशिस्त वहनचालकांवर शिस्त लागण्याच्या दृष्टीने दि.०६.०९/२०१८ पासुन ते आजपर्यंत बेशिस्त वहनचालकांवर एकुण १२०२९ केसेस व दंड रु. २६,३५,९००/-, अवैध प्रवासी एकुण केसेस ८३ व दंड रु. १,६६,६००/-तसेच लंन कटींग एकुण केसेस ६३ व दंड रु.१२,६००/-, इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच विरुध्द दिशेने आलेल्या मोठे वाहनांवर भा.दि.वि. कलम २७९ प्रमाणे ४२ केसेस दाखल करण्यात आल्या असुन लहान मोठया वाहनांवरील देखिल बेशिस्त वाहनचालकांवर एकुण ५५५ केसेस व दंड रु. १,११,०००/- आकरण्यात आला आहे.

चाकण वाहतुक विभागामध्ये अशाप्रकारे केलेल्या कारवाईचा परिणाम म्हणून अपवादात्मक परिस्थिती वगळता चाकण ता.खेड, जि.पुणे मध्ये वाहतुक कोडी सोडवण्यास यश आलेले आहे.

सद्दस्थितीत, चाकण वाहतुक विभाग अंतर्गत ०१ पोलीस निरीक्षक ०१ पोलीस उपनिरीक्षक, ४१ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या महिलांबाबत

**(४९) १३४७४५ (०६-१२-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात गत १० महिन्यात ३३० महिला बेपत्ता झाल्याची नोंद स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथे करण्यात आली तसेच लहान मुलांचे हरवण्याचे प्रमाणात वाढ झाल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर, २०१८ च्या प्रथम आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून माहे जानेवारी, २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ या दरम्यान दरमहा सरासरी २३ पुरुष तसेच ३५ महिला बेपत्ता झाल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षात महिला, पुरुष तसेच लहान मुलांच्या बेपत्ता होण्याची किती प्रकरणे दाखल आहेत तसेच सदर प्रकरणी किती जणांचा शोध घेण्यात आला,

(४) असल्यास, यास प्रतिबंध करण्याकरीता तसेच जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अनियंत्रित झाल्याने गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०१९) :** (१) व (२) पोलीस अधिक्षक, अकोला कार्यक्षेत्रातून हरवलेल्या/ बेपत्ता झालेल्या पुरूष व महिला बाबतची सन २०१८ मधील (माहे, आक्टोंबर पर्यंत) सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| प्रकार | हरविले | मिळाले | बेपत्ता |
|---|---|---|---|
| पुरूष | २४० | १६५ | ७५ |
| महिला | ३३० | २७४ | ५६ |

तसेच माहे, नोव्हेंबर मध्ये १ मुलगा व ३ मुली बाबत गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यापैकी १ मुलगा व १ मुलगी यांचा शोध घेण्यात आला आहे.

(३) पोलीस अधिक्षक, अकोला कार्यक्षेत्रातून मागील पाच वर्षात पुरुष, महिला तसेच मुल व मुली बेपत्ता बाबतची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

अ) पुरूष व महिला -

| सन | पुरुष | | | | महिला | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १८ वर्षा आतील | | १८ वर्षा वरील | | १८ वर्षा आतील | | १८ वर्षा वरील | |
| | हरविले | मिळाले | हरविले | मिळाले | हरविले | मिळाले | हरविले | मिळाले |
| २०१४ | ५२ | ५२ | २१४ | १८६ | ५८ | ५६ | २५८ | २४३ |
| २०१५ | ८ | ८ | २३४ | २०४ | ९ | ९ | २३४ | २२४ |
| २०१६ | ० | ० | २१३ | १८९ | ० | ० | २८८ | २६४ |
| २०१७ | ० | ० | २३७ | १८७ | ० | ० | २९१ | २६१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | ० | ० | २४० | १६५ | ० | ० | ३३० | २७४ |
| एकुण | ६० | ६० | ११३८ | ९३१ | ६७ | ६५ | १४०१ | १२६६ |

ब) मुल व मुली -

| सन | १८ वर्षा आतील | | | |
|---|---|---|---|---|
| | मुल | | मुली | |
| | हरविले | मिळाले | हरविले | मिळाले |
| २०१४ | ०६ | ०६ | २१ | १९ |
| २०१५ | २६ | २४ | ५४ | ५० |
| २०१६ | २३ | २२ | ६५ | ६१ |
| २०१७ | ३३ | २८ | ६७ | ५९ |
| २०१८ | २६ | २४ | ८९ | ६४ |
| एकुण | ११४ | १०४ | २९६ | २५३ |

(४) महिला, पुरुष तसेच लहान मुलांच्या बेपत्ता प्रकरणी खालीलप्रमाणे प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१) हरविलेल्या मुलांच्या बाबतीत थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. २) हरविलेल्या बालकांसंदर्भात आदर्श कार्यप्रणाली (SOP) अन्वये सर्व पोलीस घटकांना सूचना दिल्या आहेत. ३) www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. ४) पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते. ५) माहिती पुस्तिका प्रकाशित केली जाते. ६) संकटात सापडलेल्या बालकांसाठी १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. ७) अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरीता १२ अनैतिक मानवी वाहतुक कक्षाची (AHTU) स्थापना करण्यात आली आहे. ८) अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध या विषयावरील One Life NO Price या सीडी द्वारे जागृती करण्यात येते. ९) बाल भिक्षेकरी मुक्त करण्याकरीता मुंबईच्या धर्तीवर एकुण २४ महानगरपालिका श्रेत्रामध्ये टास्कफोर्स गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. १०) राज्यातील पोलिस स्टेशनमध्ये ०१ पोलिस अधिकारी हा बाल कल्याण अधिकारी म्हणुन नेमण्यात आलेला आहे. तसेच सर्व ४६ पोलिस घट्कांचे मुख्यालयात विशेष बाल पोलिस पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. ११) राज्यात दि. ०१ जुलै, २०१५ ते दि. ३१ जुलै, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ५ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेतंर्गत एकुण २०११२ हरवलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई नाशिक (ता.भिवंडी) महामार्गालगतच्या ठाणे खाडी किनाऱ्यावरील दिवे अंजूर गावांच्या हद्दीत कांदळवन तोडून बांधकाम केल्याबाबत

**(५०) १३४७८७ (०४-०१-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५८५ (43)

(१) मुंबई नाशिक (ता.भिवंडी) महामार्गालगतच्या ठाणे खाडी किनाऱ्यावरील दिवे अंजूर गावांच्या हद्दीत कांदळवन तोडून तेथे मातीचा भराव टाकून मुंबई (बाम्बे) हॉटेलचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामांच्या संदर्भात कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली असून सबंधित प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या सह सचिवांना माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान कारवाईचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने तसेच सीआरझेड कायद्याचे आणि कांदळवन संरक्षण कायद्यानुसार सदर अनधिकृत बांधकामावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर स्थळाची पहाणी दि. १०/१२/२०१८ रोजी केली आहे. मौजे दिवे अंजूर हे गाव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे क्षेत्रात समाविष्ठ असल्याने त्यांचेकडुन नकाशा मंजुर करुन न घेता अनिधिकृत बांधकाम केल्याने मालका विरुद्ध तहसिलदार, भिवंडी यांनी कारणे दाखवा नोटीस दि. ३१/१२/२०१५ रोजी बजावली होती. सदर नोटीस विरुद्ध जागा मालकाने मा. सिव्हिल जज्ज, भिवंडी यांचे न्यायालयात अपिल दाखल केले होते. तथापी सदरचे अपिल दि. ०२/०१/२०१६ रोजी मा.न्यायालयाने फेटाळल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिटपिटीशन दाखल केले आहे. त्यानुसार दि. १४/०४/२०१६ रोजी स्थगिती आदेश पारीत केले असुन दावा न्याय प्रविष्ठ आहे. वन परिक्षेत्र अधिकारी, भिवंडी यांचे दि. ३०/०५/२०१८ चे अहवाल प्रमाणे मुंबई ठाणे हॉटेलचे केलेले बांधकाम हे कांदळवन सर्व्हे नंबर पैकी क्षेत्रात नाही. सदरची जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे क्षेत्रात येत असल्याने सक्षम अधिकारी म्हणुन अनिधिकृत बांधकामाबाबत पुढील कारवाई करणेबाबत तहसील कार्यालयाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दि.२७/०६/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.